# मराठी विभाग

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करणे ही मराठी विभागाची उज्वल परंपरा आहे. दरवर्षी प्रथम श्रेणीत आलेल्या तृतीय वर्ष कला मराठीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मराठी विभाग आयोजित करीत असतो. यावर्षी १९ जुलै २००८ रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. शकुंतला सिंग यांच्या हस्ते १) कु. अश्विनी भारत ढमढेरे २) रेखा कृष्णा जाधव ३) सुजाता मुरलीधर सिनकर या तृतीय वर्ष कला मराठी विषयात प्रथम श्रेणीत आलेल्या विद्यार्थिनींचा ग्रंथभेट आणि एक टंवटवीत गुलाबाचे फुल देउन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास मराठी विभाग प्रमुख प्रा. दामोदर मोरे, प्रा. अनिल भाबड, प्रा. संतोष राणे हे उपस्थित होते.

तृतीय वर्ष (कला) मराठीच्या विद्यार्थ्यांना ‘तिची कथा’ हे स्त्रीवादी पुस्तक अभ्यासाला आहे. हे लक्षात घेऊन तृतीय वर्ष कला आणि द्वितीय वर्ष कला मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रा. सुचित्रा नाईक आणि प्रा. प्रियंवदा टोकेकर यांच्या स्त्रीवादी साहित्यांच्या संदर्भातील व्याख्यानाचा कार्यक्रम ४ ऑगस्ट २००८ रोजी आयोजित करण्यात आला होता. विवाहाचे बदलते स्वरूप व त्याचे साहित्यात पडणारे तेव्हा पासून ते आजच्या ‘लीव इन रिलेशनशीप’ या सर्व काळाचा प्रवास येथे अधोरेखित करण्यात आला. त्या-त्या काळातील स्त्रीवादी कथांतील काही प्रसंग आणि संवाद दोघींनी सादर केल्यामुळे कार्यक्रमाला वेगळीच रंगत आली. यावेळी प्रा. सुचित्रा नाईक आणि प्रियंवदा टोकेकर यांनी काही स्त्रीवादी गाणीही गायली ज्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलले.

प्रथम वर्ष कला शाखा मराठी भाषा (एक) या विषयासाठी लावलेले. ‘हॅम्लेट’ हे नाटक विल्यम शेक्सपियरच्या हॅम्लेट या नाटकावर आधारित व बी.वी.सी. निर्मित पूर्ण लांबीचा हॅम्लेट नावाचा इंग्रजी चित्रपट महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात १९ डिसें. २००८ रोजी सकाळी ९ ते १२.३० या दरम्यान मराठी , हिंदी आणि इंग्रजीच्या विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा. दामोदर मोरे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. प्रमोद खराटे, प्रा. अनिल भाबड, प्रा. संतोष राणे, प्रा. संतोष गायकवाड, डॉ. सुजा अब्राहम इ. प्राध्यापक उपस्थित होते.

- प्रा. दामोदर मोरे